# गावठी हातभट्टी दारुची वाहतुक करणा-या आरोपीस अटक एकुण ८,२६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- oo ---

**मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी अवैध्द् गावठी दारु धंदयांवर व त्यांची निर्मीती, वाहतुक यावर कडक कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत.** त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि श्री. संतोष पाटील व तपास पथक अंमलदार यांना अवैध्द् धंदे व त्यांना होणारी वाहतुक यावर कडक कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.पिंपरी चिंचवड परीसरात बाहेरुन गावठी दारुची विक्री गुप्त रित्या होत असते त्यावर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि. संतोष पाटील हे सोबतचे तपास पथकातील पोलीस अंमलदारांसह पेट्रोलींग करीत असताना **सपोफौ.बिभीषण कन्हेरकर** यांना विश्वासु बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, काळाखडक वाकड पुणे येथुन दारुची वाहतुक करणारा पिकअप पिंपरी चिंचवड मध्ये जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने सपोनि.संतोष पाटील, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.अतिश जाधव, पोशि रमेश खेडकर यांनी काळाखडक वाकड पुणे येथे सापळा रचुन बातमी प्राप्त पांढरे रंगाचा महीद्रा पिकअप रजि. क्र. MH-१४-JL-३५९४ हा आले नंतर तो थांबवुन त्यातील चालकास ताब्यात घेतले. सदर चालकास त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने स्वतःचे नाव संदीप रामकिशोर सरोज वय ४५ वर्षे रा.राजेश पान स्टॉल बाजुला कुदळवाडी पुणे मुळ रा. कलवापुर ता.सोरांवु जि.इलाहाबाद राज्य-उत्तरप्रदेश असे सांगीतले. पिकअपची झडती घेतली असता त्यामध्ये गावठी हातभट्टी दारुने भरलेले एकुण ३६ मोठे हत्ती कॅण्ड मिळुन आले आहेत. सदरबाबत वाकड पो.स्टे. गु.रजि.नं. ३११/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(अ), ८३ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला आहे.

आरोपी याने सदरची गावठी दारु लोणी काळभोर येथुन आणले असलेचे माहीती प्राप्त झाली असुन अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.मनोज लोहीया सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, **सपोफौ.बिभीषण कन्हेरकर**, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, सपोफौ.राजेंद्र मारणे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा संतोष बर्गे, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड